MHAH160000102018

दाखल केल्याची तारीख ०२/०१/२०१८
नोंदणी केल्याची तारीख ०२/०१/२०१८
घोषित केल्याची तारीख १६/०३/२०२१
कालावधी वर्षे महिने दिवस
०३ ०२ १४

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी श्री. सुदाम एस. काळे यांचे समोर)

**नियमित फौ.ख.क्र. ०१/२०१८** **निशाणी क्र. ५४**

महाराष्ट्र शासन मार्फत,
पोलीस निरीक्षक,
राजुर पोलीस ठाणे,
ता. अकोले, जि. अहमदनगर. .... **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

**१. मयुर लहानु मुर्तडक,**
वय — २२ वर्षे, धंदा — शिक्षण
**२. किरण सुभाष वराडे,**
वय — ३४ वर्षे, धंदा — व्यापार
**३. श्रीकांत शामराव वालतुले,**
वय — २२ वर्षे, धंदा — व्यापार
**४. वैभव उर्फ हितेश गोविंद भारस्कर,**
वय — २५ वर्षे, धंदा — व्यापार
सर्व रा. राजुर, ता. अकोले,
जि. अहमदनगर. .... **आरोपी**

.............................................................................................

सरकार तर्फे सहाय्यक सरकारी विधिज्ञ :— श्री. एन. आर. कहाणे.
आरोपी नं. १ ते ४ तर्फे विधिज्ञ :— श्रीमती. ए. पी. डेरे

.............................................................................................

**न्यायनिर्णय**

(जाहीर केल्याचा दिनांक १६ मार्च, २०२१)

सदरील खटला आरोपींच्या विरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ नुसार भरविण्यात आला आहे.

२. **अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** —

फिर्यादी शांताराम लक्ष्मण काळे, रा. राजुर, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे त्याचे कुटुंबासह राहत असुन तो पत्रकारीताचे काम करतो. दिनांक १७/०२/२०१७ रोजी रात्री ०९.३० चे सुमारास त्याला सौ. मनिषा विलास पाबळकरचा फोन आला व ती त्याला म्हणाली की, 'मला दोन लोक दमदाटी करतात, तुम्ही लवकर इकडे या'. त्यानंतर तो तिचे घरी गेला असता त्याठिकाणी आरोपी क्र. १ व २ तिचेसोबत जागेचे कारणावरून भांडण करीत होते. त्यावेळी तो आरोपी क्र. १ व २ यांना समजावुन सांगुन घरी आला व जेवण करून झोपला. त्यानंतर दिनांक १८/०२/२०१७ रोजी रात्री १२.१५ वाजेचे सुमारास त्याचे घरासमोरील कुत्रयाचा व शिवीगाळ केल्याचा आवाज ऐकु आल्याने त्याने दार उघडुन बाहेर येवुन पाहिले असता आरोपी क्र. १ ते ४ यांनी सौ. मनिषा विलास पाबळकर हिचे भांडण सोडविल्याचे कारणावरून त्याचे घरात घुसुन त्याला, त्याची पत्नी मंजुषा व मुले स्वप्निल व ऋषीकेश यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींच्या विरूध्द राजुर पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदविली. फिर्यादीचे फिर्यादवरुन राजुर पोलीस ठाण्यात आरोपींचे विरुध्द गुन्हा नोंदणी क्र. ४/२०१७, भारतीय दंड विधान नुसार दंडनिय कलम ४५२, ३२३, ५०४ आणि ५०६ सहकलम ३४ प्रमाणे नोंदविण्यात आला.

३. दिनांक १८/०२/२०१७ रोजी तपासी अधिकारी श्री. जी. टी. फटांगरे, सहाय्यक पो. उपनिरीक्षक, राजुर पोलीस ठाणे यांनी घटनास्थळावर जावून दोन पंचा समक्ष सदर घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा तयार केला. आरोपींना अटक केली. आरोपींचे अटक पंचनामे तयार केले. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. तपासाचे काम पुर्ण झाल्यानंतर आरोपींचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. दिनांक ०१/०३/२०१९ रोजी आरोपी क्र. १ ते ४ हे माझे समक्ष न्यायालयात हजर झाले. मी आरोपींचे विरुध्द आरोपपत्र (निशाणी ३३) नोंदविले. आरोपींनी गुन्हा नाकबुल केल्यामुळे त्यांचे निवेदन (निशाणी ३४ ते ३७) नोंदविले.

५. आरोपीचें विरोधात कुठलाही गुन्हा शाबीत करू पाहणारा सबळ पुरावा न आल्याने त्यांचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले नाहीत. अभियोग पक्षाने एकुण चार साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

६. माझे विचारार्थ घेतलेले मुद्दे व त्यांच्या निष्कर्षावरील सकारण भुमिका येणेप्रमाणे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो काय, आरोपींनी समान उद्देश साधन्याचे हेतुने फिर्यादीच्या घरामध्ये अनाधिकाराने प्रवेश करुन फिर्यादी व साक्षीदारांना इजा पोहचेल असे कृत्य केले ? | .... नाही |
| २) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी समान उद्देश साधन्याचे हेतुने फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्क्यांनी इच्छापूर्वक मारहाण करून साध्या स्वरूपाची दुखापत पोहोचवली? | .... नाही |
| ३) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी समान उद्देश साधन्याचे हेतुने फिर्यादीचे व साक्षीदाराचे हातून शांतताभंग व्हावा किंवा अन्य काही अपराध घडवून आणण्याचे उद्देशाने त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करून त्यांना प्रक्षोभित केले ? | .... नाही |
| ४) | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपींनी समान उद्देश साधन्याचे हेतुने फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | .... नाही |
| ५) | अंतिम आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबत :—**

मुद्दा क्रमांक १ ते ४ हे एकमेकांशी संलग्नित असल्यामुळे मी त्यांचे एकत्रित विवेचन करु इच्छितो.

७. प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप शाबीत करण्याच्या हेतूने अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. १ फिर्यादी शांताराम लक्ष्मण काळे (निशाणी ४६), साक्षीदार क्र. २ मंजुषा शांताराम काळे (निशाणी ४८), साक्षीदार क्र. ३ ऋषीकेष शांताराम काळे व साक्षीदार क्र. ४ स्वप्निल शांताराम काळे (निशाणी ५०) यांचा पुरावा नोंदविलेला आहे. सदर साक्षीदार क्र. १ ते ४ यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी क्र. १ ते ४

हे त्याचे गावात राहण्यास असुन त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये मागील भांडणाचे कारणावरून वाद झाले होते व गैरसमजुतीने फिर्यादी साक्षीदार क्र. १ ने आरोपींच्या विरूध्द फिर्याद नोंदविली होती.

८. साक्षीदार क्र. १ ते ४ यांनी अभियोगपक्षास मदत केली नाही त्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना फितूर घोषित करून भारतीय पुराव्याचा कायदा कलम १५४ प्रमाणे विचारणा केली असता अभियोग पक्षाने दिलेल्या सर्व सुचना त्यांनी नाकारल्या. परंतु त्यांच्या उलटतपासावरून त्यांचेमध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाच्या बाहेर आपआपसांत वाद मिटल्याचे ते मान्य करतात.

९. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने फिर्यादी व जखमी साक्षीदारानां तपासले परंतु सदरचे अभियोगपक्षाचे साक्षीदारांचे पुराव्यावरून त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही तसेच ज्या व्यक्तींना मारहाण करून, शिवीगाळ करून, धमकी देवून, साध्या स्वरूपाची दुखापत करण्यात आली त्याच व्यक्ती जर आरोपींचे विरूध्द काहीही सांगत नसतील तर इतर साक्षीदारांची साक्ष तपासणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय ठरेल. सबब अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

१०. साक्षीदार क्र. १ ते ४ यांनी त्यांचे उलटतपासामध्ये सदर प्रकरण आरोपींसोबत तडजोड होवून न्यायालयाबाहेर आपआपसांत मिटल्याचे सांगितले आहे व तशी पुरसीस (निशाणी ४५) अन्वये दाखल केली आहे. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, सदर प्रकरण आरोपी क्र. १ ते ४ व फिर्यादी यांच्यात आपआपसांत न्यायालयाबाहेर मिटल्यामुळे फिर्यादी आरोपींविरूध्द काहीही सांगत नाही. अभियोगपक्षाचा पुरावा शुन्य असल्यामुळे त्यांचे पुराव्याचे विवेचन करण्यासारखे काहीही दिसून येत नाही. तसेच आरोपीं विरूध्द लावण्यात आलेले कलमांचे स्वरूप पाहता व आरोपी क्र. १ ते ४ हे फिर्यादीचे गावातील असल्याने साक्षीदारांविरूध्द खोटी साक्ष दिली म्हणुन कोणतीही कारवाई करणे उचित ठरत नाही. सबब, समोर आलेला साक्षीपुरावा पाहता मी मुद्दे क्र. १ ते ४ चे संयुक्तिक उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबत</u> :—**

११. दोषारोप पत्रामध्ये मुददेमाल जप्त केल्याचा उल्लेख नाही. अभियोगपक्षाने आरोपींचे विरोधात कोणताही भक्कम व विश्वासपात्र पुरावा दिलेला नाही. त्यामुळे योग्य

(५)   नि.फौ.ख.क्र. ०१/२०१८ (न्यायनिर्णय नि. ५४)

आणि सबळ पुराव्याअभावी आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. वरील विवेचनाला अधिन राहून मी मुद्या क्र. ५ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

(१) आरोपी क्र. १ मयुर लहानु मुर्तडक, आरोपी क्र. २ किरण सुभाष वराडे, आरोपी क्र. ३ श्रीकांत शामराव वालतुले व आरोपी क्र. ४ वैभव उर्फ हितेश गोविंद भारस्कर यांची भारतीय दंड विधानाचे दंडनिय कलम ४५२, ३२३, ५०४ आणि ५०६ सहकलम ३४ या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(२) आरोपींनी यापुर्वी दिलेले त्यांचे वैयक्तिक जातमुचलके व बंध पत्रे रदद करण्यात येतात.

(३) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ च्या तरतुदी प्रमाणे आरोपींनी त्यांचे वैयक्तिक जात मुचलके व बंधपत्रे दयावेत. सदरचे बंधपत्रे हे पुढील सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहतील व त्यानंतर ते आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

ठिकाण : अकोले
दिनांक : १६/०३/२०२१

(सुदाम एस. काळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
अकोले.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Smt. Komal Mangesh Lasure |
| Court name | : Judicial Magistrate, First Class Akole. |
| Date of Judgment | : 16/03/2021 |
| Judgment sign by P.O. | : 16/03/2021 |
| Judgment uploaded on | : 16/03/2021 |